**ठळक बातम्या**

- भारतीय समुदाय जगभर उत्तम कामगिरी करत असून देशाला त्याचा अभिमान आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- क्षयरोग निर्मूलन अभियानासंदर्भात केंद्रीय गृह मंत्रालयाचं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना पत्र
- स्पेडेक्स मोहिमे अंतर्गत दोन उपग्रहांच्या जोडणीचा प्रयोग लांबणीवर
- एएसबी क्लासिक टेनिस स्पर्धेत भारताचा युकी भांब्री त्याच्या फ्रेंच जोडीदारासह पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत दाखल

  **आणि**

- प्रसिद्ध पत्रकार आणि लेखक प्रितीश नंदी यांचं निधन

**<><><><><>**

भारतीय समुदाय जगभर उत्तम कामगिरी करत असून देशाला त्याचा अभिमान आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज ओदिशामध्ये भुवनेश्वर इथं १८ व्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचं औपचारिक उद्घाटन करताना बोलत होते.

**होल्ड ‘बाईट’**

प्रवासी भारतीय दिवस संमेलन, हा केंद्रसरकारचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम, परदेशात स्थायिक झालेल्या भारतीय समुदायाला परस्परांच्या संपर्कात येऊन संवाद साधण्यासाठी महत्त्वाचं व्यासपीठ प्रदान करतो. भारतीय समुदायाच्या

पर्यटनासाठी खास तयार करण्यात आलेल्या ‘प्रवासी भारतीय एक्स्प्रेस’ला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज दृक्श्राव्य माध्यमातून हिरवा झेंडा दाखवला.

युवा प्रवासी भारतीय दिनाच्या उद्घाटना बरोबर कालपासून प्रवासी भारतीय दिन सोहळ्याला सुरुवात झाली. ‘परदेशस्थ भारतीयांचं विकसित भारतासाठी योगदान’, ही यंदाच्या तीन दिवसीय प्रवासी भारतीय दिवस सोहळ्याची संकल्पना आहे. विविध देशांमधल्या भारतीय समुदायाचे सदस्य मोठ्या संख्येनं या संमेलनाला उपस्थित आहेत. डॉ एस जयशंकर, अश्विनी वैष्णव, जुआल ओरम आणि ओदिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री या अधिवेशनाला उपस्थित आहेत.

जगभरात भारता विषयीची धारणा मजबूत करण्यात युवा प्रवासी भारतीयांनी महत्वाची भूमिका बजावली असून, देशाने ‘विकसित भारताच्या’ दिशेनं प्रवास सुरु केला आहे, असं परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यावेळी म्हणाले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाच्या समारोप समारंभाला उपस्थित राहणार आहेत. यावेळी त्या परदेशस्थ भारतीय समुदायाच्या सदस्यांना विविध क्षेत्रातल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल ‘राष्ट्रपती प्रवासी भारतीय सन्मान’ प्रदान करतील.

**<><><><><>**

देशभरात सुरू असलेल्या क्षयरोग निर्मूलन अभियानासंदर्भात केंद्रीय गृह मंत्रालयाने सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना पत्र लिहिलं आहे. देशातून क्षयरोगाचं समूळ उच्चाटन व्हावं यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असून या

अभियानात राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांनीही सहभागी व्हावं असं आवाहन या पत्रातून केंद्रानं केलं आहे.

सर्व कारागृहं तसंच सुधारगृहांमध्ये १०० दिवसांच्या या अभियानाचं आयोजन करण्यात यावं, असे निर्देशही या पत्रात दिले आहेत. कारागृहांची रचना आणि त्यात असलेली कैद्यांची संख्या यामुळे क्षयरोगाचा संसर्ग वाढण्यासाठी पूरक वातावरण तयार होतं. कैद्यांना भेटायला येणाऱ्या कुटुंबियांमार्फत मग त्याचा प्रसार होतो, त्यामुळे हे अभियान मोठ्या प्रमाणावर राबवण्याची गरज या पत्रात व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे येत्या ३ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान राज्यांचे आरोग्य विभाग, राज्य तसंच जिल्हा पातळीवरचे क्षयरोग निवारण अधिकारी यांच्या मदतीने कारागृहांमध्ये निःक्षय शिबिराचं आयोजन करण्यात यावं. तसंच, २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान सर्वांना निःक्षय शपथ द्यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

नांदेड वाघाळा शहर महानगर पालिकेत निःक्षय अभियानांतर्गत निःक्षय क्ष-किरण यंत्र वाहनाचं अनावरण आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते आज करण्यात आलं. या अभियानांतर्गत लातूर इथे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते क्षयरुग्णांना पोषण आहार कीटचं वितरण करण्यात आलं.

**<><><><><>**

'आपले सरकार सेवा पोर्टल'वर सध्या उपलब्ध असलेल्या ऑनलाइन सेवांचा विस्तार करण्यासाठी, राज्य सेवा हक्क आयोगानं आवश्यक पावलं उचलावीत असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. सेवा पोर्टलवर सध्या ५३६ पेक्षा जास्त सेवा उपलब्ध असून, त्याचा विस्तार केल्यावर नागरिकांना

अत्यावश्यक सेवा अधिक सुलभतेने आणि कार्यक्षमतेने मिळतील असं ते यावेळी म्हणाले. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली काल मुंबईत महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.

'आपले सरकार सेवा पोर्टल'च्या माध्यमातून ऑनलाइन सेवा देणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य असून, सरकारनं गतिशील आणि पारदर्शक प्रशासन जनतेपर्यंत पोहोचवलं आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

सध्याच्या डिजिटल युगात ऑनलाइन शिक्षण हे एक महत्त्वाचं साधन आहे. शिक्षकांनी बदलतं तंत्रज्ञान आत्मसात करून विद्यार्थ्यांमध्ये जीवनकौशल्यं रुजवावीत, असं आवाहन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या ३३व्या दीक्षांत समारंभात ते काल बोलत होते. या समारंभात दहा विद्यार्थ्यांना राज्यपालांनी सुवर्णपदक देऊन गौरवलं. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत आपण परिवर्तनाचं युग सुरू केलं आहे, असं राज्यपाल यावेळी म्हणाले. विद्यार्थी, समाज आणि उद्योगांच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करावे लागतील, असंही त्यांनी सांगितलं. उच्च शिक्षणातलं सकल नोंदणीचं प्रमाण २०३५ पर्यंत ५० टक्क्यांपर्यंत न्यायचा निर्धार केला असून यामुळे शिक्षण क्षेत्रातल्या सर्वांवर पडलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे, असंही राज्यपालांनी सुचवलं.

**<><><><><>**

आपला पक्ष सत्तेत जाणार या अफवा असून सत्तेत जाण्यापेक्षा लढणं पसंत करू, असं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी काल

स्पष्ट केलं. मुंबईत झालेल्या पक्षपदाधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते. पुढच्या पंधरा दिवसात पक्षात मोठे बदल पाहायला मिळतील, असंही ते म्हणाले. राज्यात आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची चर्चा सुरू झाली आहे, या निवडणुकांना महाविकास आघाडी म्हणूनच आपण सामोरे जाऊ, असंही पवार यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था -इस्त्रोनं स्पेडेक्स मोहिमेच्या अंतर्गत पृथ्वीच्या जवळच्या कक्षेत फिरणाऱ्या दोन उपग्रहांचं डॉकिंग म्हणजे जोडणीचा प्रयोग लांबणीवर टाकला आहे. दोन उपग्रहांमधलं अंतर जास्त वाढल्यामुळे हा प्रयोग पुढे ढकलावा लागल्याचं इस्त्रोनं स्पष्ट केलं आहे. इस्त्रोनं यापूर्वी हा प्रयोग सात जानेवारीला घेण्याचं जाहीर केलं होतं, मात्र तेव्हाही या वाढलेल्या अंतरामुळे तो पुढे ढकलून आज घेण्याचं जाहीर करण्यात आलं होतं. आता पुढचा प्रयोग कधी होईल हे लवकरच जाहीर केलं जाईल असं इस्त्रोनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

मुंबई आणि ठाण्यात उद्यापासून २१ वा थर्ड आय आशियाई चित्रपट महोत्सव सुरु होत असून त्याचं उद्घाटन महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांच्या हस्ते होणार आहे. या महोत्सवात ६० हुन अधिक देशी विदेशी चित्रपट सादर होणार असून पटकथा लेखक आणि गीतकार जावेद अख्तर यांना एशियन कल्चर पुरस्कार प्रदान केला जाईल. हॉलिवूड चित्रपटांप्रमाणे उत्तम आशियाई

चित्रपटही रसिकांपर्यंत पोहचावेत यासाठी या महोत्सवाचं आयोजन केल्याचं महोत्सवाचे संचालक संतोष पाठारे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

ऑकलंड इथं सुरू असलेल्या एएसबी क्लासिक टेनिस स्पर्धेत भारताचा युकी भांब्री आणि फ्रेंचचा अल्बानो ऑलिवेट्टी या जोडीने पुरुष दुहेरी प्रकाराच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्यांनी लॉयड ग्लासपूल आणि ज्युलियन कॅश या तिसऱ्या मानांकित ब्रिटीश जोडीचा ३-६, ६-४, १२-१० असा पराभव केला. राजीव राम आणि ख्रिश्चन हॅरिसन या अमेरिकन जोडीनेही उपांत्यपूर्व फेरीत फ्रान्सच्या सॅडियो डुम्बिया आणि फॅबियन रेबोल या जोडीचा ७-५, ६-७, १०-५ असा पराभव करून स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली आहे.

**<><><><><>**

प्रसिद्ध पत्रकार आणि लेखक प्रितीश नंदी यांचं काल मुंबईतल्या राहत्या घरी हृदयविकाराच्या धक्क्यानं निधन झालं. ते ७३ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर काल अंत्यसंस्कार करण्यात आले. प्रितीश नंदी यांना साहित्यविश्वातल्या योगदानासाठी १९७७ मध्ये पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित केलं होतं. ते राज्यसभेचे खासदारही होते. १९९०च्या दशकात दूरदर्शनवर ‘द प्रितीश नंदी शो’ हा मुलाखतींचा कार्यक्रम ते करत असत. ‘प्रितीश नंदी कम्युनिकेशन्स’ या कंपनीद्वारे त्यांनी २०००च्या दशकात अनेक गाजलेल्या चित्रपटांची निर्मिती केली. इंग्रजीत लेखन, तसंच बंगाली, उर्दू आणि पंजाबी कवितांचं इंग्रजीत भाषांतरही प्रितीश नंदी यांनी केलं होतं. चित्रपटसृष्टीतून त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त होत आहे.